## ३४ कालीका देवी महाविद्यालय, शिरुर कासार, ता. शिरुर (का.), जि. बीड 2013-14.

### (अ) महाविद्यालय स्तरावरील उपक्रम–

- दि. ८ सप्टेंबर २०१३ रोजी महाविद्यालयातील आजीवन शिक्षण व विस्तार आणि लोकप्रशान विभागाच्या वतीने अंतराष्ट्रीय साक्षरता दिनाचे आयोजन करण्यात आले. या प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉ. हनुमंत रणखांब हे होते. तर प्रमुख वक्त्या म्हणून प्रा. दराडे मॅडम होत्या. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. हनुमंत रणखांब यांनी सांगीतले की, भारतीय समाजातील परिवर्तनासाठी सर्व समाज हा साक्षर असने गरजेचे असून या मुळे भारतास वेगवेळया क्षेत्रात प्राधान्याने विकासास चालना मिळू शकेल.
- दि. २ ऑक्टोबर २०१३ रोजी महाविद्यालयात आजीवन शिक्षण व विस्तार विभाग च्या वतीने निबंधस्पर्धा आयोजित केल्या गेल्या यात खालीलप्रमाणे विषय ठेवण्यात आले.

  १. स्त्री–भृणहत्या–समस्या आणि उपाय २. कै. सौ. केशरकाकू क्षीरसागर यांचे शैक्षणिक कार्य या स्पर्धेत मुलांनी उस्फुर्त सहभाग घेतला. त्यात त्यांना प्रथम द्वितीय व तृतीय क्रमांक देण्यात आले.
- दि. ८ डिसेंबर २०१३ रोजी महाविद्यालयातील आजीवन शिक्षण व विस्तार विभाग आणि सिक्युरिटी अँन्ड इंन्टीलिजन्स सुव्हस लिमिटेड यांच्या संयुक्त विद्यामाने कॅम्पस मुलाखतीचा कार्यक्रम ठेवण्यत आला. या वेळी महाविद्यालयातील एकुण २४ विद्यार्थी सिक्युरिटी गार्ड म्हणून नियुक्त करण्यात आले. या वेळी भरती आधिकारी मा. किरण इरकर यांनी मुलांना मुलाखतीसाठी बोलावून आमच्या महाविद्यालयातील मुलांची निवड केली.
- दि. २५ जानेवारी २०१४ रोजी सकाळी १०.३० वा महाविद्यालयाच्या आजीवन शिक्षण व विस्तार विभाग आणि लोकप्रशासनशास्त्र विभागाच्या वतीने सिंदफन या गावी साक्षरता रॅली काढण्यात आली. प्रौढ, साक्षरते बरोबरच कायदा साक्षरता, संविधान साक्षरता यांची सुध्दा गरज आहे. यामुळे समाज जागृत होऊन सर्व समाज परिवर्तन प्रक्रियेत सहभागी होईल म्हणून कायदा साक्षरता असने काळाजी गरज आहे.
- दि. २७ जानेवारी २०१४ रोजी समाजस्तरावर लोणी या गावी प्रौढ, निरंतर शिक्षण व विस्तार सेवा विभाग आणि लोकप्रशासन शास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यामाने उच्च शिक्षण विषयक कौटुंबिक सर्वे घेण्यात आला यासाठी एक दहा प्रश्नांची प्रश्नावली बनविण्यात आली होती. हा सर्वे विस्तार विभागाचे स्वंयसेवक व लोकप्रशासनशास्त्राचे विद्यार्थी यांनी केला. या सर्वेत अनेक गोष्टी निदर्शनात आल्या त्यात विद्यार्थी कौटंबिक पाश्वभूमी, आर्थिक परिस्थिती, सामाजिक परिस्थिती, उच्च शिक्षण विषयक दृष्टिकोण, उच्च शिक्षण सुविधा, उच्च शिक्षण विषयक ग्रामीण भागातील पालकांची मानसिकता, उच्च शिक्षण विषयी पालक–विद्यार्थी यांचा दृष्टिकोण, त्यांना उच्च शिक्षणासाठी येणाऱ्या अडचणी अशा अनके बाबीवर सर्वे करण्यात आला.
- दि. १२ फेब्रुवारी २०१४ रोजी महाविद्यालयातील आजीवन शिक्षण व विस्तार विभाग आणि लोकप्रशासन विभाग यांच्या संयुक्त विद्यामाने शैक्षणिक सहलीचे आयोजन करण्यात आले. ही सहल प्रथम हिवरेबाजार ता. जि. अहमदनगर येथे व नंतर राळेगणसिध्दी या गावी नेण्यात आली. ही सहल प्रा. विठ्ठल जाधव (कार्यक्रमाधिकारी, आजीवन शिक्षण व विस्तार विभाग) यांच्या नेतृत्वाखाली संपन्न झाली.
- दि. १२/३/२०१४ रोजी कालिकादेवी महाविद्यालयातील आजीवन शिक्षण व विस्तार विभाग आणि लोकप्रशासन शास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यामाने एक दिवशीय आरोग्य शिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आले. हा कार्यक्रम प्राचार्य डॉ. हनुमंत रणखांब यांच्या अध्यक्षेतेखाली संपन्न झाले या कार्यक्रमात प्रमुख वक्त्या म्हणून गृहशास्त्र विभागाच्या प्रमुख डॉ. चेतना डोंगळीकर या होत्या.



*समाजस्तरावरील आपत्तीव्यवस्थापन संरक्षण कार्यक्रमात वारजी या गावात प्रात्यक्षिक दाखवताना एकनाथ गर्जे दिसत आहेत.*

## ३५ पदमभूषण वसंतदादा पाटील महाविद्यालय, पाटोदा, जि. बीड

### (अ) महाविद्यालय स्तरावरील उपक्रम–

- २ ऑगस्ट २०१३ रोजी महाविद्यालयाच्या सभागृहामध्ये बैठकीची आयोजन करण्या आले. यामध्ये ५० स्वयंसेवक विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. या कार्यक्रमात आजीवन शिक्षण आणि विस्तार विभागाची माहिती प्रा. डॉ. बळीराम राख यांनी दिली. स्वयंसेवक निवडीसाठी विभागाच्या सर्व सदस्यांनी सहभाग नोंदवला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य व व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद, डॉ. दत्तात्रयजी आघाव हे उपस्थित होते त्यांनी अध्यक्षीय समारोप केला.



Scanned by CamScanner